महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक :.०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९८ दिनांक २०/१०/२०१४

विषय : महावितरण कंपनीत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यानी वैयक्तिक कामासाठी राजकीय पक्षाकडून किंवा तिऱ्हाईत व्यक्तीकडून दबाव आणणेबाबत.

......

महावितरण कंपनीतील अधिकारी/कर्मचारी यांनी वैयक्तिक कामासाठी उदाहरणार्थ नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी व यासारख्या इतर कामांकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय पक्षाचे लोकप्रतिनीधी, आमदार, खासदार, कंपनी बाहेरील अधिकारी, पदाधिकारी किंवा इतर प्रभावी / वजनदार वरिष्ठ अधिकारी यांचेकडून शिफारसींचा प्रयत्न केल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंग कारवाई करून संबंधीतांच्या सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात त्यासंदर्भात नोंद करण्याबाबतच्या सूचना यापुर्वी वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित कर्मचारी सेवाविनियमाच्या वर्तणुक, शिस्त व अपील विनियमांतर्गत खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

**सेवानियम ८५ (ढ) :** कंपनीचा कोणताही कर्मचारी कंपनीचा एक कर्मचारी म्हणून व्यक्तिशः त्याच्याशी संबंधीत किंवा सर्वसाधारणतः कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही वर्गाशी संबंधीत किंवा कंपनीच्या कोणत्याही कामकाजाशी संबंधीत अशा कोणत्याही प्रश्नाबाबत शासनाकडे किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा कोणत्याही विधानमंडळ सदस्याकडे तक्रार घेऊन जाणार नाही.

३. तथापि, या बाबतीत वेळोवळी वरीलप्रमाणे सूचना पारित करूनही काही अधिकारी/कर्मचारी हे त्यांच्या वैयक्तिक कामाकरिता उदाहरणार्थ नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी व यासारख्या इतर कामांकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय पक्षांकडून किंवा इतर प्रभावी/वजनदार व्यक्तींकडून दबाव आणत असल्याचे तसेच शिफारसीचा प्रयत्न करत असल्याचे आढळून आले आहे. संबंधीत कर्मचाऱ्याची सदरची कृती या संदर्भात वेळोवेळी पारित केलेल्या सूचनांच्या विरुध्द आहे.

४. सबब, सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निर्देश देण्यात येत आहेत की, उपरोक्त सूचनांचे अवलोकन करून त्यांचे पालन होईल याबाबतची दखल घ्यावी. वैयक्तिक कामाकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दबाव/शिफारस करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सदरच्या

कृतीबाबत गंभीर दखल घेण्यात येऊन संबंधीतांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच त्याबाबतची नोंद मानव संसाधन प्रणाली अंतर्गत त्या त्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक माहितीमध्ये घेण्यात येईल व सदरची माहिती विनंती बदली अथवा बढती यावेळी विचारात घेण्यात येईल.

५. सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या सूचना आपले अखत्यारितील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबतची खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे या आदेशांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून मानव संसाधन प्रणालीमध्ये अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या वैयक्तिक माहितीमध्ये नोंद घेण्याबाबतची खबरदारी सर्व संबंधीतांनी घ्यावी.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm.Cir.F.N.5.doc*